<u>नि.फौ.प्र.क.११५३/२०१७</u>
<u>सरकार वि. रेणू</u>
<u>निशाणी कमांक – ०६</u>

**<u>सरकारतर्फे साक्षीदार कमांक –०१</u>**

**<u>मी शपथेवर खरे सांगतो की,</u>**

**माझे नाव :** रत्नाकर सदाशिव मेश्राम
वय – ५७ वर्षे, व्यवसाय – नोकरी, हेड कॉन्सटेबल,
पोलीस मुख्यालय, ब.न.४४९९, नागपूर.
राह. भगवान नगर, नागपूर.

**<u>सरतपासणी न्यायालयातर्फे शपथेवर सुरू.</u>**

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहायक सरकारी वकील सौ. पी.टी. धासकट यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

१) दि.१०.०३.२०१६ रोजी मी पोलीस स्टेशन लकडगंज येथे नायक या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी माझी सकाळी ०९.०० ते २१.०० पर्यंत पेट्रोलींग डयुटी होती. डयुटीवर असतांना मी स्वतः, ए.पी.आय. वाघमारे, एन.पी.सी. दिपक करोकर व महिला पोलीस कॉन्स्टेबल माधुरी असे गंगा जमुना परिसरात पेट्रोलींग करीत असतांना अंदाजे १७.३० वाजताच्या सुमारास एक महिला रस्त्याच्या कडेला उभी राहून लोकांना हातवारे करुन आकर्षित करीत होती. महिला पोलीस कॉन्सटेबल माधुरीच्या मदतीने त्या महिलेला ताब्यात घेतले. तिला पोलीस स्टेशनला घेवून गेलो. तिच्याकडे चौकशी केली असता तिने तिचे नांव रेणू महादेवसिंग धनावत असे सांगितले. एपीआय श्री वाघमारे यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दिली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच आहे. त्यावर एपीआय श्री. वाघमारे यांची सही आहे. मी त्यांचेसोबत काम केले असल्यामुळे मी त्यांची सही ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क.०७</u>** देण्यात येते. पुढील तपास एपीआय श्री. वाघमारे यांनी केला. त्या महिलेला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आज कोर्टात

असलेली महिला ही तीच आहे.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपी तर्फे ॲड. श्री. ए.आर. रावलानी.**

२) हे म्हणने खरे आहे की, दररोज डयुटीवर हजर झाल्यानंतर संबंधित रजिस्टरला डयुटीवर हजर झाल्याबाबत आम्ही नोंद करतो. प्रस्तुत प्रकरणात घटनेच्या दिवशी मी पोलीस स्टेशनला डयुटीवर हजर होतो हे दाखविण्याकरीता डयुटी चार्ट दाखल केला नाही. हे म्हणने खरे नाही की, त्या दिवशी मी डयुटीवर हजर नव्हतो म्हणून मी तो चार्ट दाखल केलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, पेट्रोलींगला जाण्यापूर्वी त्याबाबत डयुटी रजिस्टरला नोंद केली जाते. हे म्हणने खरे आहे की, सदर प्रकरणात मी डयुटी रजिस्टरची प्रत मी दाखल केली नाही. हे म्हणने खरे नाही की, त्या दिवशी आम्ही पेटोलींग करीता गेलो नव्हतो म्हणून डयुटी रजिस्टरची प्रत दाखल केलेली नाही.

३) हे म्हणने खरे आहे की, मी ज्या घटनेबाबत माझ्या सरतपासात कथन केली आहे ती घटना दि.१०.०६.२०१६ ची नाही. त्या दिवशी माझ्या समक्ष तपासी अधिकारी यांनी आरोपी क्र.१ ही ज्या लोकांना हातवारे करुन इशारे करीत होती त्या लोकांकडे किंवा इतर लोकांकडे चौकशी केली नव्हती. त्या घटनेची आम्ही व्हिडीओ रेकॉर्डींग किंवा फोटो काढले नव्हते. त्या ठिकाणी जाण्यापूर्वी आम्ही बनावट ग्राहक त्या ठिकाणी पाठविला नव्हता.

४) हे म्हणने खरे नाही की, दि.१०.०३.२०१६ रोजी मी पोलीस स्टेशनला डयुटीवर हजर नव्हतो तसेच त्या दिवशी मी गंगा जमुना परिसरात पेट्रोलींग डयुटीकरीता हजर नव्हते. हे म्हणने खरे नाही की, त्या दिवशी माझ्या समक्ष अंदाजे ०५.३० वाजताच्या

दरम्यान आरोपी क्र.१ ही रस्त्याच्या बाजुला उभी राहून जाणा–या येणा–या लोकांना इशारे करुन आकर्षित करीत नव्हती. हे म्हणने खरे नाही की, दि.१०.०३.२०१६ रोजी महिला पोलीस कॉन्सटेबल माधुरी हिच्या मदतीने आम्ही आरोपी क्र.१ ला ताब्यात घेतले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने तिचे नांव रेणू धनावत असे सांगितले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, दि.१०.०३.२०१६ रोजी मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही व त्या दिवशी आम्ही कोणत्याही आरोपीला ताब्यात घेतले नाही. सदर प्रकरणात माझे बयाण नोंदविले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नाही म्हणून माझे बयाण नोंदविले नाही. हे म्हणने खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपीचा सदर प्रकरणाशी कोणताही संबंध नाही.

**उलट तपास संपला.**

**फेरतपास–काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत — समक्ष

(ए.पी. गिरडकर)
१६ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

नागपूर.
दि.०७/११/२०२२.

<u>नि.फौ.प्र.क.११५३/२०१७</u>
<u>सरकार वि. रेणू</u>
<u>निशाणी कमांक – ०६</u>

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word same as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik